**होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र**

(टाटा मूलभूत संशोधन संस्था)

वि. ना. पुरव मार्ग, मानखुर्द, मुंबई ४०००८८

**खगोलशास्त्र शिक्षण उपक्रम**

**अंतिम परीक्षा २**

**नाव:** **इयत्ता ८ वी.**

**शाळेचे नाव:** **दिनांक:** /०८

१. पृथ्वी म्हणजे काय?

२. दोन गटातील शब्दांच्या जोड्या जुळवा:

| | | |
|---|---|---|
| i. | पृथ्वी | |
| ii. | सूर्य | ग्रह |
| iii. | गुरू | तारा |
| iv. | ध्रुव | उपग्रह |
| v. | चंद्र | |
| vi. | व्याध | |

३. रिकाम्या जागा भरा:

i. पृथ्वीचा आकार _ _ _ _ _ _ _ _ _ _ आहे.
(थाळीसारखा, वाटीसारखा, लाडूसारखा, अंड्यासारखा)

ii. सूर्यमालेत _ _ _ _ _ _ _ ग्रह आहेत.

Iii. या ग्रहांची नावे आहेत :

४. i. पृथ्वी हालते का? _ _ _ _ _

ii. जर हालत असेल तर पृथ्वीच्या हालचालीचे वर्णन करा.

५. पृथ्वीचे चित्र काढा. त्यात पृथ्वीचा अक्ष दाखवा.
उत्तर ध्रुव, दक्षिण ध्रुव, विषुववृत्त काढून नावे द्या.
त्याच चित्रात पृथ्वी स्वतःभोवती फिरते हे दाखवा.

६. पृथ्वीला स्वतःभोवती एक फेरी पूर्ण करायला किती वेळ लागतो? _ _ _ _ _

७. पृथ्वी स्वतःभोवती फिरता फिरता सूर्याभोवती फिरते हे आपल्याला माहित आहे. एका चित्रात सूर्य आणि पृथ्वी काढून पृथ्वीची सूर्याभोवती फिरण्याची कक्षा दाखवा. त्याच आकृतीत चंद्र दाखवून चंद्राची कक्षा दाखवा.

८. पृथ्वीला सूर्याभोवती एक फेरी पूर्ण करायला किती वेळ लागतो?

९. स्वयंप्रकाशी आणि परप्रकाशी अशा २ गटांमध्ये वर्गीकरण करा:
सूर्य, पृथ्वी, आरसा, बल्ब, ग्रह, दिव्याची ज्योत, काजवा, तारे, ढग, चंद्र

| स्वयंप्रकाशी | परप्रकाशी |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

१०. अंतरानुसार क्रम लावा: पृथ्वीच्या जवळ असणाऱ्या वस्तू आधी आणि लांब असणाऱ्या वस्तू नंतर या क्रमाने लिहा.
सूर्य, चंद्र, वीज, ध्रुवतारा

११. लहान-मोठेपणानुसार क्रम लावा: आधी लहान आणि नंतर मोठ्या वस्तू लिहा.
गुरू, सूर्य, चंद्र, पृथ्वी, तुटता तारा